**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचे माजी प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांचं निधन, देशभरात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर
- मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह जगभरातून शोक व्यक्त
- देशातल्या बँकांच्या नफ्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाल्याची रिझर्व्ह बँकेच्या अहवालात माहिती

**आणि**

- बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या ४७४ धावा, भारताची फलंदाजी गडगडली

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचं काल नवी दिल्ली इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. काल संध्याकाळी प्रकृती गंभीर झाल्यामुळे त्यांना नवी दिल्लीतल्या एम्स रुग्णालयात दाखल केलं होतं. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

*26 सप्टेंबर 1932 रोजी फाळणीपूर्व भारताच्या पंजाब प्रांतातल्या एका गावात जन्मलेल्या, डॉ. मनमोहन सिंग यांनी 2004 ते 2014 या काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या यूपीए सरकारमध्ये सलग दोन वेळा प्रधानमंत्री पदाचा कार्यभार सांभाळला.*

*ऑक्सफर्डमधून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवल्यावर मनमोहन सिंग यांनी काही काळ संयुक्त राष्ट्रांसाठी काम केलं. 1971 मध्ये, ते भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयात आर्थिक*

*सल्लागार म्हणून रुजू झाले. त्यांनी अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार आणि सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, प्रधानमंत्र्याचे सल्लागार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही काम केलं. डॉ. मनमोहन सिंग यांनी 1991 आणि 1996 मध्ये केंद्रीय अर्थमंत्री म्हणून काम केलं, आणि आर्थिक सुधारणांचं व्यापक धोरण आखलं.*

*तत्कालीन प्रधानमंत्री पीव्ही नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले डॉ. सिंग यांना 1991 मधल्या आर्थिक सुधारणांचे शिल्पकार समजलं जातं, ज्याने आर्थिक उदारीकरणाच्या युगाची सुरुवात झाली. डॉ. सिंग 1991 ते 2024 या काळात राज्यसभेचे सदस्य होते. 33 वर्षांच्या सेवेनंतर ते यंदाच्या एप्रिलमध्ये राज्यसभेतून निवृत्त झाले.*

*महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, माहितीचा अधिकार कायदा आणि राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा, हे डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतलेले महत्वाचे निर्णय होते.*

डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर नवी दिल्ली इथं संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या निधनाबद्दल सरकारनं ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. डॉ सिंग हे अशा दुर्मिळ राजकारण्यांपैकी एक होते, ज्यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही विश्वात आपला ठसा उमटवला, असं राष्ट्रपतींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग हे

असामान्य अर्थ तज्ञ होते, ज्यांनी भारताच्या आर्थिक परिप्रेक्षात परिवर्तन घडवलं, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताच्या आर्थिक धोरणावर मजबूत ठसा उमटवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. डॉ. सिंग यांनी आपल्या प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांचं जीवन सुधारण्यासाठी केलेल्या व्यापक प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली आहे.

डॉ.मनमोहन सिंग यांनी आरबीआयचे गव्हर्नर ते अर्थमंत्री आणि प्रधानमंत्री म्हणून देशाच्या कारभारात  महत्त्वाची भूमिका बजावल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

डॉ. सिंग यांच्या नेतृत्वानं पक्षपातळीवर प्रशंसा आणि आदर मिळवला असून, त्यांचा वारसा पिढ्यानपिढ्या राष्ट्र उभारणीसाठी प्रेरणा देत राहील, असं भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा यांनी म्हटलं आहे.

डॉ. सिंग यांचे नेतृत्व, नम्रता आणि समर्पण सदैव स्मरणात राहील, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

भारतानं एक दूरदर्शी राजकारणी, अभेद्य एकतेचा नेता आणि अतुलनीय उंचीचा अर्थतज्ज्ञ गमावल्याचं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

डॉ. मनमोहन सिंग यांनी असामान्य शहाणपण आणि सचोटीनं भारताचं नेतृत्व केलं. त्यांची  नम्रता आणि अर्थशास्त्राची सखोल जाण यामुळे देशाला

प्रेरणा मिळाली, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

माजी प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी शोक व्यक्त केला आहे. भारताचे अर्थमंत्री म्हणून सर्वात आव्हानात्मक काळात त्यांनी देशाला आर्थिक संकटातून यशस्वीपणे पुढे नेलं आणि जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा पाया घातला, असं त्यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, कॅबिनेट मंत्री रामदास आठवले यांनी माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल जगभरातल्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. अफगाणिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष हमीद करझाई, मालदीवचे माजी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद नाशीद, भारतातले रशियाचे राजदूत डेनिस अलीपोव्ह यांनी डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल समाज माध्यमावर शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

भारतीय बीज सहकारी संस्थेनं कमी पाणी आणि कमी कीटकनाशकांच कमी प्रमाण आवश्यक असलेल्या बियाण्यांच्या उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रीत केलं पाहिजे असं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं

आहे. भारतीय बीज सहकारी संस्थेच्या काल झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. लहान शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त उत्पादन मिळावं यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असं शहा म्हणाले. भारतीय बीज सहकारी संस्थेनं भारतातल्या पारंपारिक बियांचं संकलन आणि संवर्धन करण्याच्या दिशेने वेगाने काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. इफको आणि कृभकोने आपल्या देशी आणि संकरित बियाण्यांच्या पोषणमूल्यांचे मूल्यमापन केले पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

**<><><><><>**

केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी काल नवी दिल्ली इथं श्रम मंत्रालयात सक्तवसुली अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या ३४ उमेदवारांना नियुक्ती पत्रं दिली. निवड झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन करून डॉ. मांडविय यांनी कामगारांच्या कल्याणासाठी परिश्रम करण्याचं आणि कामगार कायद्याच्या पालनाकडे लक्ष देण्याचं आवाहन केलं. त्यांनी अधिकाऱ्यांना त्यांच्या सचोटी, समर्पण आणि वचनबद्धता या मूल्यांचे पालन करण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

देशातल्या बँकांच्या नफ्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षापर्यंत सलग सहा वर्षं वाढ झाली असून, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीतही वाढीचा कल कायम असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. रिझर्व्ह बँकेनं देशातील बँकिंग आणि त्यातला कल याबाबतचा एक अहवाल काल प्रसिद्ध केला, त्यात ही माहिती देण्यात आली आहे. बँकांच्या मालमत्तेची गुणवत्ता

सुधारत राहिली असून, अनुत्पादित कर्जांचं प्रमाण 13 वर्षांतील सर्वांत कमी पातळीवर राहिलं. चालू वर्षाच्या मार्च अखेरीला एनपीए २ पूर्णांक ७ दशांश टक्के आणि सप्टेंबरच्या अखेरीला २ पूर्णांक ५ दशांश टक्के नोंदवलं गेल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल रात्री वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हान यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिकेतल्या धोरणात्मक भागीदारीच्या प्रगतीवर आणि सध्याच्या प्रादेशिक तसंच जागतिक घडामोडींवर चर्चा केली. डॉ. जयशंकर २४ डिसेंबरपासून सहा दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत.

**<><><><><>**

भारतीय तटरक्षक दलानं एमएसव्ही ताज धरे हराम या संकटग्रस्त जहाजातून नऊ भारतीय कर्मचाऱ्यांची सुटका केली. हे जहाज पाकिस्तानच्या शोध आणि बचाव क्षेत्रात गुजरातमधील पोरबंदरच्या पश्चिमेला सुमारे ३११ किलोमीटर अंतरावर होतं. गुजरातमधील मुंद्रा बंदरातून ते येमेनकडे निघालं होतं, मुंबई आणि पाकिस्तानच्या सागरी बचाव समन्वय केंद्रांनी परस्पर सहकार्यानं ही बचाव मोहीम राबवली.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियात मेलबर्न इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी

ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात सर्व बाद ४७४ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजी गडगडली. विराट कोहली आणि के एल राहुल हे दोघं अनुक्रमे ३६ आणि २४ धावांवर बाद झाले. रोहित शर्मा अवघ्या तीन धावा करू शकला तर आकाशदीप शून्यावर बाद झाला. सलामीला उतरलेल्या यशस्वी जयस्वालने ८२ धावा केल्या. या धावांच्या बळावर आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारताच्या पाच बाद १६४ धावा झाल्या होत्या. दरम्यान, माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी भारतीय संघाचे खेळाडू दंडावर काळ्या फिती बांधून खेळत होते.

//<><><><><>//